**नि.क्र ३५ खालील आदेश**
**(पारित दि.८/०९/२०२२)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे प्रमाणे (या पुढे ‘संहिता’) चे कलम १५१ प्रमाणे पोलीस मदतीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वादीने हा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटप व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. या कामी नि.क्रं ५ वरील अर्जाचे आदेशानुसार प्रतिवादी यांनी वाद मिळकत हि कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये व वादी यांचे ताबे वहिवाटीस हरकत अगर अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा हुकुम दि.२९/०७/२०२१ रोजी पारित झालेला आहे. त्यानंतर दि. १२/०८/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास वादी नं १ व वादी नं ३ हे त्यांच्या शेतजमीन गट नं ९३० मध्ये लावलेले भात व सोयाबीन खुरपण्यासाठी व बेनण्यासाठी गेले असता, तेथे प्रविण रामचंद्र शिवतरे, प्रशांत रामचंद्र शिवतरे व प्रमोद रामचंद्र शिवतरे म्हणजे प्रतिवादी नं १ ते ३ तेथे आले व त्यांना “तुम्ही या शेतामधुन बाहेर व्हा तुम्हाला आम्ही काहीही देणार नाही. उलट परत मिळकतीमध्ये पाय ठेवल्यास तुमचा खुन करु व वादी नं ३ यांचे दोन्ही हातपाय तोडुन टाकु” असे म्हणाले. त्यावर वादी नं १ यांनी प्रतिवादी यांना मे. भोर कोर्टाचा मनाईचा हुकुम दाखविला असता, ते म्हणाले “आम्ही कोर्ट वगैरे मानत नाही व त्यामुळे त्याचा कोणताही आदेश आम्ही माणनाार नाही तुम्हाला जे काय करायचे ते करा” असे म्हणुन वादी यास धक्का बुक्की करुन शिवीगाळ केली. त्यामुळे प्रतिवादी यांचे पासुन वादी यांचे कुटुंबास धोका असल्याने वादी यांनी दि.१२/०८/२०२१ रोजी वादी यांनी भोर पोलीस स्टेशन यांच्याकडे झालेल्या प्रकाराबाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता व त्याप्रमाणे वादी यांनी दि. १२/०८/२०२१ रोजी पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठविलेला होता. सदरील अर्जानुसार भोर पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे वादी यांना सदरचा अर्ज करणे भाग पडले. तसेच वादी यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले की, वादींचा अर्ज खोटा व

बनावट असुन तो या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाही. वादींनी सदरचे अर्जामध्ये कथन केलेला मजकुर हा खेटा असुन वादी हे दि.१२/०८/२०२१ रोजी दावा मिळकतीत गेलेच नव्हते तसेच प्रतिवादी क्रं १ हे कामानिमित्त पुणे येथे होते व प्रतिवादी क्रं २ व ३ हे वैद्यकीय कारणास्तवर बाहेरगावी होते. त्यामुळे सदरची घटना घडलेली नाही, केवळ प्रतिवादी यांना त्रास देणेचे हेतुने वादींनी सदरचा खोटा व बनावट असा अर्ज दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी यांनी नि. क्र ५ चे आदेशाविरुध्द पुणे येथील जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले असुन सदरचे अपिल एम.सी.ए १७३/२०२१ पुणे येथील कोर्टात प्रलंबित आहे. तसेच सदर अपिलाचे कामी वादी यांनी त्यांचा लेखी जबाब दिलेला आहे व सदर अपिल युक्तीवादा कामी नेमलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रतिवादीविरुध्द तात्पुर्ता मनाई करिता नि.क्रं ५ अन्वये अर्ज दाखल केला असुन सदर अर्ज मंजुर करण्यात आला आहे. सदर अर्ज दि.२९/०७/२१ रोजी मंजुर करण्यात आला आहे. तदनंतर प्रतिवादीने सदर आदेशा विरुद अपिल दाखल केले असुन प्रतिवादीने दाखल केलेले अपिल रदद करण्यात आला आहे. प्रतिवादीने सदर आदेशाची सत्यप्रत नि.क्रं ५६ अन्वये दाखल केलेली आहे. सदर अपिलातील आदेशानुसार प्रतिवादीने वादीचे सामाईक ताबे वहिवाटीस हरकत करु नये असा तात्पुर्ता मनाई आदेश पारित करण्यात आला आहे. त्याच बरोबर प्रतिवादीने दावा मिळकत क्रं १अ मध्ये त्यांचा व वादी करिता शेती मशागत करण्याची परवानगी देण्यात आली असुन शेती उत्पन्नाचे खाते न्यायालयासमोर दाखल करण्याचा आदशे करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे म्हणणे असे की, ते गट नं ९३० मध्ये गेले असता प्रतिवादी क्रं १ ते ३ यांनी त्यांना हरकत घेतली व त्यांना धमकी दिली. म्हणुन वादीने प्रस्तुतचा अर्ज सदर अपिल प्रलंबित असताना दाखल केलेला आहे. या ठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया

संहितेचे कलम १५१ अन्वये दाखल केलेला आहे. सदर अर्जामुळे वादी त्यांना दावा मिळकतीमध्ये वहिवाट करणेकरिता पोलीसांची मदत मिळावी अशी विनंती करत आहेत. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे मा.जिल्हा न्यायालय यांचे अपिलातील आदेशानुसार प्रतिवादीं यांना दावा मिळकत १अ मध्ये मशागत करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशामधील परिच्छेद क्रं १९ मध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे परस्परांविरुध्द फौजदारी कारवाई झाालेली आहे. सदर बाब ध्यानात घेउन मा. जिल्हा न्यायाधिश,पुणे यांनी प्रतिवादी यांना दावा मिळकत १अ हि वादीकरिता देखील वहिवाटण्याची परवानगी दिलेली आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींचे विरुध्द वादीस दावा मिळकतीमध्ये वहिवाट करण्याकरिता पोलीसांची मदत देणे उचित होणार नाही.

७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १५१ नुसार गंभीर प्रकरणांमधील गरज व न्यायाचे हित ध्यानात घेता पक्षकारांना पोलीसांची मदत देता येते. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीस पोलीसांची मदत दयावी अशी गंभीर परिस्थितीत दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादीने ते वादीस धमकी देत आहेत अथवा अडथळा करत आहेत हे नाकारले आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रकरणातील एकंदरीत परिस्थिती व मा. जिल्हा न्यायालय यांचे अपिलातील आदेश ध्यानात घेता वादीस पोलीसांची मदत देणे अत्यावश्यक वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे उचित आहे. म्हणुन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नि.क्र ३५ नामंजुर करण्यात येतो.

सही

दि.८/०९/२०२२

(एच.यु.यु.पाटील)
सह.दिवाणी न्यायाधीश,भोर,जि.पुणे.

**"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order**
**Name of the Steno :V.G.Fulari**
**Court Name : Smt. H.U.U. Patil**
**J.M.F.C., Bhor, Dist. Pune.**
**Date : 12/09/2022**
**Order signed by presiding officer on : 12/09/2022**
**Order uploaded on: 13/09/2022 "**